दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587



# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे








वर्ष ५ । अंक ३१० । शुक्रवार ११ सप्टेंबर २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322




देशभरातील सर्व राष्ट्रीयकृत बँक कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांच्या संदर्भात एक दिवसीय संप पुकारला आहे. त्यानिमित्त अहिल्यानगर शहरातील राष्ट्रीयकृत बँका पूर्णपणे बंद होत्या. (छाया- राजू खरपुडे, नगर)

# भुईकोटसाठी खरे प्रयत्न विखे पाटील यांचेच; लंकेनी श्रेय लाटण्याची स्टंटबाजी करू नये

## दोन वर्षांचा घटनाक्रम आणि कागदपत्रे तपासा; केवळ एमओयू झाल्यानंतर श्रेय घेणे योग्य नाही – उपमहापौर धनंजय जाधव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या विकासासाठी जिल्हा प्रशासन आणि भारतीय लष्कर प्रशासनामध्ये सामंजस्य करार झाल्याचे स्वागत आहे. या करारामुळे किल्ल्याच्या विकासकामांचा मार्ग मोकळा झाला असून, अहिल्यानगरच्या ऐतिहासिक वारशाचे संवर्धन आणि पर्यटन विकासाला निश्चितच चालना मिळणार आहे. मात्र, या विकासकामाचे श्रेय घेण्यासाठी सुरू झालेली राजकीय स्टंटबाजी निश्चितच दुर्दैवी आहे.

भुईकोट किल्ल्याच्या विकासासाठी खरे प्रयत्न आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केला आहे. हे मी केवळ राजकीय आरोप म्हणून सांगत नाही, तर या संपूर्ण प्रक्रियेची कागदपत्रे आणि त्यावरील तारखा याची साक्ष देतात. त्यामुळे खासदार निलेश लंके यांनी प्रत्येक विकासकामाचे श्रेय घेण्याची स्टंटबाजी करण्यापेक्षा भुईकोटच्या गेल्या दोन वर्षांचा घटनाक्रम तपासावा.

भुईकोटच्या विकासाचा विषय आजचा किंवा कालचा नाही. ६ मार्च २०२४ रोजीच केंद्र सरकारच्या पर्यटन मंत्रालयाने अहमदनगरची श्रेणीमध्ये अंतर्गत



निवड केली होती आणि भुईकोट किल्ल्यासाठी २५ कोटी रुपयांच्या विकासकामांना मंजुरी मिळाली होती. त्यामुळे या प्रकल्पाची सुरुवात नेमकी कुठून झाली, हे स्पष्ट आहे. यानंतर किल्ल्याच्या काही भागावर संरक्षण विभागाचे अधिकार असल्याने मंजूर विकासकामे प्रत्यक्ष सुरू करण्यासाठी संरक्षण विभागाची परवानगी हा महत्त्वाचा टप्पा होता. त्यासाठी तत्कालीन खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच तत्कालीन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्याकडे पत्रव्यवहार करून भुईकोटच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या संरक्षण विभागाच्या परवानगीचा प्रश्न मांडला होता.

यानंतरही प्रक्रिया पुढे नेण्यासाठी पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला. २३ मे २०२६ रोजी त्यांनी शिर्डी येथील डिफेन्स क्लस्टरच्या कार्यक्रमाप्रसंगी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांना पत्र देऊन भुईकोट किल्ल्याच्या पर्यटन विकासकामांसाठी आवश्यक संरक्षण विभागाची मंजुरी आणि ची प्रक्रिया लवकर पूर्ण करण्याची मागणी केली.

त्यानंतर २५ जून २०२६ रोजी संरक्षण मंत्रालयाने महाराष्ट्र पर्यटन संचालनालयासोबत सामंजस्य करार करण्यास मान्यता दिली. संरक्षण जमिनीची मालकी किंवा दर्जा बदलणार नाही आणि त्या जमिनीवरील कोणतेही हक्क हस्तांतरित होणार नाहीत, अशा अटींसह ही मान्यता देण्यात आली. त्यानंतर २ जुलै २०२६ रोजी भारतीय लष्कराकडून भुईकोट किल्ल्यातील पर्यटन विकासकामांना ‘ ’ देण्यात आली. म्हणजेच संरक्षण विभागाशी संबंधित महत्त्वाचा अडथळा दूर झाला आणि विकासकामांना प्रत्यक्ष सुरुवात करण्याचा मार्ग मोकळा झाला. मग आता माझा साधा प्रश्न आहे गेल्या दोन वर्षांच्या या संपूर्ण प्रक्रियेत नेमके काय झाले, हे कागदपत्रांवरून जनतेसमोर ठेवायला हवे की केवळ अंतिम ■ पान ४ वर

# एमपीएससी सचिवाच्या तोंडाला काळे फासले

## संभाजी ब्रिगेडचा सरकारला थेट इशारा; अध्यक्षांचाही नंबर लागणार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर– मुंबई :** एमपीएससी औषध निरीक्षक पेपर फुटी प्रकरणी राज्य सरकारने कोणतीही ठोस कारवाई न केल्याने अखेर संभाजी ब्रिगेडने आक्रमक पवित्रा घेतला आहे. एमपीएससी चे सचिव महेंद्र हरपाळकर यांच्या तोंडाला संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी काळे फासत या भ्रष्ट व्यवस्थेचा जाहीर निषेध केला आहे. ही कारवाई संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत, मुंबई अध्यक्ष सुहास राणे आणि योगेश पाटील यांनी केली आहे.

याप्रकरणी संभाजी ब्रिगेडने इशारा दिला होता ३ ऑगस्ट रोजी पेपर फुटी प्रकरणी संभाजी ब्रिगेडने राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर धरणे आंदोलन केले होते. त्याचवेळी प्रदेशाध्यक्ष ॲड. मनोज आखरे यांनी इशारा दिला होता की, सरकारने कारवाई नाही केली तर तीव्र आंदोलन छेडले जाईल. सरकारने या इशाऱ्याकडे दुर्लक्ष ■ पान ४ वर

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नगर शहरात कोम्बिंग ऑपरेशन

## वॉरंटमधील ७१ आरोपींवर कारवाई

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नगर शहर उपविभागात पोलिसांनी गुरुवारी मध्यरात्री ऑलआऊट व कोम्बिंग ऑपरेशन राबवले. कोतवाली, तोफखाना आणि भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकाच वेळी ही शोधमोहीम राबवण्यात आली.

या मोहिमेदरम्यान विविध गुन्ह्यांत फरार व पाहिजे असलेल्या अजामीनपात्र वॉरंटमधील ४१ आणि जामीनपात्र वॉरंटमधील ३० अशा तब्बल ७१ आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांच्यावर अटकेची कायदेशीर कारवाई केली.

याशिवाय अवैध धंद्यांवर छापे टाकत महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे ६ गुन्हे दाखल करण्यात आले. तसेच गोमांस प्रकरणी १, महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये (कलम १२ अ) १ आणि मद्यपान करून वाहन चालवणाऱ्यावर (ड्रंक अँड ड्राईव्ह) १ कारवाई करण्यात आली. वाहतूक तपासणीदरम्यान मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर ४४ केसेस दाखल करण्यात आल्या आहेत.

या विशेष मोहीम पाठकात पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे, पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य व सहायक पोलीस निरीक्षक तेजस्वी थोरात यांच्या नेतृत्वाखालील पथकातील पोलीस उपनिरीक्षक देशमुख, समाधान सोळंके, दीपक मेढे, परशुराम दळवी, प्रवीण पाटील, आव्हाड, पवार, अकोलकर, सफौ थोरात, सफौ सुधीर क्षीरसागर, ■ पान ४ वर

# जन्म–मृत्यू दाखले बिनचूक भरा; नागरिकांनी वेळेत दाखले घेऊन जावे

## सीआरएस पोर्टलवरील नोंदणीबाबत खासगी रुग्णालयांच्या डॉक्टर–कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन उपस्थित नसलेल्या रुग्णालयांना नोटीस बजावण्याचे आयुक्त यशवंत डांगे यांचे निर्देश



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जन्म–मृत्यू दाखल्यांबाबत नागरिकांची गैरसोय होऊ नये तसेच सीआरएस पोर्टलवरील नोंदणीमध्ये चुका होऊ नयेत, यासाठी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील खासगी रुग्णालयांमधील डॉक्टर व कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. जन्म–मृत्यू नोंदणी काळजीपूर्वक आणि बिनचूक करणे आवश्यक असून, नोंदणीमध्ये झालेल्या चुकांमुळे पुढे नागरिक व रुग्णांच्या नातेवाईकांना मनस्ताप होऊ नये, याची दक्षता घेण्याचे आवाहन मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

या कार्यशाळेस मनपा आयुक्त यशवंत डांगे, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, डॉ. रणजीत सत्रे, डॉ. सी. डी. मिश्रा, डॉ. संजयकुमार धोंडे, डॉ. दीपमाला चव्हाण, डॉ. अश्विनी मरकड, प्रभाग अधिकारी राकेश कोतकर आदींसह खासगी रुग्णालयांतील डॉक्टर व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले की, जन्म–मृत्यू दाखल्यांच्या नोंदणीमध्ये अचूकता असणे अत्यंत आवश्यक आहे. सीआरएस पोर्टलवरील नोंदींमध्ये दुरुस्ती करण्यासाठी आरोग्य विभागाकडे मोठ्या संख्येने अर्ज येत आहेत. त्यामुळे अशा चुका टाळण्यासाठी रुग्णालयांनी जन्म–मृत्यू नोंदणी करताना आवश्यक ती काळजी घ्यावी.

कार्यशाळेला ■ पान ४ वर


कोणत्याही प्रकारचे कर्ज आता त्वरीत मिळवा!
गरजेला नक्कीच मदत आमची, उभे राहण्याची हिंमत तुमची !
राघव लोन सर्व्हिसेस
सर्व प्रकारच्या कर्ज सुविधा
▪ जलद मंजुरी ▪ कमी व्याजदर ▪ सुलभ हफ्ते
व्यावसायिक कर्ज 75 लाखांपर्यंत (विनातारण)
जुन्या जेसीबी,ट्रॅक्टर, हायवा,कार, इ. साठीही कर्ज पुरवठा



विनातारण कर्ज
▸ व्यवसायीक व पगारदारांसाठी खास सी.सी / ओ.डी सुविधा
▸ डॉक्टर लोन
▸ आकर्षक व्याजदर
तारण कर्ज
▸ घर,एन.ए प्लॉट,व्यवसायिक मालमत्ता यासाठी कर्ज सुविधा
▸ आर.झोन,गुंठेवारी,ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ता यावरही त्वरीत कर्ज
वाहन कर्ज
▸ नविन व जुन्या कारसाठी कमीत कमी व्याजदरात त्वरीत कर्ज
▸ व्यावसायिक वाहनांसाठी शासकीय अनुदान
विनातारण व्यावसायिक कर्जासाठी आवश्यक कागदपत्रे : ▸ पॅन कार्ड ▸ आधार कार्ड ▸ शॉप ॲक्ट ▸ उद्यम आधार ▸ मागील तीन वर्षांचे आयटीआर ▸ बँक अकाऊंट स्टेटमेंट (पीडीएफ मध्ये) ▸ जीएसटी सर्टिफिकेट ▸ लाईट बिल ▸ फोटो
सर्व प्रकारच्या व्यवसायासाठी शासकीय कर्ज योजनांचे ऑनलाईन फॉर्म भरुन मिळतील तसेच कर्जासाठी योग्य मार्गदर्शन केले जाईल
अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ
मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम
ओ.बी.सी. महामंडळ योजना
(टीप - या योजनांसाठी सेवाशुल्क आकारले जाईल)
नियम व अटी लागू
700+ सिबिल स्कोअर 700+ असल्यास प्राधान्य
कोणतेही चालू कर्ज थकीत नसावे
आम्ही संपूर्ण महाराष्ट्रात कर्ज सेवा देतो
नामांकीत बँका व एनबीएफसी चे अर्थसहाय्य उपलब्ध !
अधिक माहितीसाठी संपर्क : 9960283285
पत्ता : शॉप नंबर 29,स्टेट बँके समोर,सुरजनगर,शिरुर,ता.शिरुर

## दै. आकर्षण निवडक

### लोणी प्रवराचा अभय जगताप ठरला कराटेचा गोल्डन बॉय

अहिल्यानगर- लोणी प्रवरा येथील शालेय खेळाडू अभय भाऊसाहेब जगताप याने पुणे येथील बालेवाडी क्रीडा संकुलात ६ सप्टेंबर २०२६ भारत कराटे अकादमी आयोजित या अजिंक्यपद स्पर्धेत दमदार कामगिरी करत सुवर्णपदक पटकाविले. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर अभयची राष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी निवड झाली असून, आगामी राष्ट्रीय स्पर्धेत तो महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे. अभय जगताप हा मूळचा नगर जिल्ह्यातील लोणी प्रवरा येथील असून, राज्यस्तरीय स्पर्धे त त्याने छत्रपती संभाजीनगर टीमकडून सहभाग घेतला होता. त्यात त्याने उत्कृष्ट कामगिरी करत कुमिते प्रकारात सुवर्णपदक, तर काता प्रकारात कांस्यपदक मिळविले आहे. त्याच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे त्याने कराटे क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.अभय सध्या इयत्ता सहावीत शिक्षण घेत असून, वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षापासून कराटेचे प्रशिक्षण घेत आहे. नियमित सराव, मेहनत, शिस्त, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्याने विविध कराटे स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्याला शीतल जाधव यांचे मार्गदर्शन लाभत आहे. अभयच्या या यशामध्ये त्याचे आई-वडील भाऊसाहेब जगताप व अमृता जगताप यांचा मोलाचा वाटा आहे. त्याच्या यशाबद्दल प्रभाकर लोखंडे, रोहिणी लोखंडे, संध्या लोखंडे, प्रमिला लोखंडे, विक्रम लोखंडे, वीरेंद्र लोखंडे, राहुल जगताप व सायली जगताप यांनी अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### वंचितांच्या मदतीसाठी झटणाऱ्या शिक्षिका हेलन पाटोळे यांना राज्यस्तरीय 'उडाण' पुरस्कार



अहिल्यानगर- समाजातील वंचित, गरजू आणि दुर्बल घटकांसाठी सातत्याने कार्य करणाऱ्या शिक्षिका हेलन ॲलेक्स पाटोळे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल राज्यस्तरीय 'उडाण' पुरस्काराने गौरविण्यात आले. महिला सक्षमीकरण, गरजू मुलींच्या विवाहासाठी मदत, तंटामुक्ती तसेच वंचित घटकांतील मुलींना शैक्षणिक मदत अशा विविध क्षेत्रांत त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. उडाण फाउंडेशन संलग्न जय असोसिएशन ऑफ एनजीओ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात देशभक्तीपर गीते, नृत्य आणि 'महाराष्ट्राची लोकधारा' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याच कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू डॉ. शबनम शेख यांच्या हस्ते हेलन पाटोळे यांना राज्यस्तरीय 'उडाण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी पुणे येथील ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. प्रशांत साळुंके, अवतार मेहेरबाबा ट्रस्टचे संचालक मेहरनाथ कलचुरी, विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, जय असोसिएशन ऑफ एनजीओचे राज्याध्यक्ष ॲड. महेश शिंदे, उडाण फाउंडेशनच्या अध्यक्षा आरती शिंदे, शासनाचा राज्य आदर्श युवती पुरस्कार प्राप्त जयश्री शिंदे, ॲड. अनिता दिघे, ॲड. दिनेश शिंदे आदी उपस्थित होते.हेलन पाटोळे यांनी शिक्षिका म्हणून आपल्या जबाबदारीसोबतच सामाजिक कार्याचीही बांधिलकी जपली आहे. विशेषतः महिला आणि वंचित घटकांतील मुलींच्या प्रश्नांकडे त्यांनी संवेदनशीलतेने पाहत विविध प्रकारे मदतीचा हात पुढे केला आहे. समाजातील गरजू व्यक्तींना आधार देण्याबरोबरच महिलांना सक्षम करण्यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील आहेत. तंटामुक्तीसाठी पुढाकार घेत समाजातील वाद सामोपचाराने मिटविण्याचा प्रयत्न, आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या गरजू मुलींच्या विवाहासाठी मदत, महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम तसेच गरजू विद्यार्थिनींना शैक्षणिक मदत अशा अनेक माध्यमांतून त्यांचे सामाजिक कार्य सुरू आहे. विशेषतः समाजातील वंचित घटकांतील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक मदत मिळवून देणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि त्यांना आत्मनिर्भर होण्यासाठी प्रोत्साहन देणे, या कार्यामुळे पाटोळे यांनी सामाजिक क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. पुरस्कार स्वीकारल्यानंतर हेलन पाटोळे यांनी सामाजिक कार्य हे कोणत्याही पुरस्काराच्या अपेक्षेने केले जात नसल्याचे सांगितले. समाजातील गरजू व्यक्तीला मदत मिळाली, एखाद्या मुलीचे शिक्षण सुरू राहिले, एखाद्या कुटुंबाला अडचणीच्या काळात आधार मिळाला, यातच सामाजिक कार्याचे खरे समाधान आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.मिळालेला पुरस्कार हा आपल्या कार्याची दखल घेणारा असून, या सन्मानामुळे समाजासाठी आणखी जोमाने कार्य करण्याची ऊर्जा मिळणार आहे, असेही त्यांनी सांगितले. पुढील काळातही महिला, मुली आणि वंचित घटकांसाठी अधिक व्यापक स्वरूपात कार्य करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

## संत रामपाल जी महाराज यांचा अवतरण दिवस उत्साहात साजरा

**२१६ भाविकांचे रक्तदान व २५० भाविकांचा देहदान संकल्प**
**सामाजिक व धार्मिक कार्यातून शांती, एकता व सेवेचा संदेश**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** संत रामपाल जी महाराज यांनी नेहमीच सेवा कार्याला महत्त्व दिले आहे. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान आहे.सध्या रक्ताचा तुटवडा सर्वत्र मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. रक्तदान शिबिरे होत नसल्याने महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात रक्ताचा तुटवडा जाणवत असतो. या कालावधीत सतलोक आश्रम ढवळपुरी येथे संत रामपाल जी महाराज यांच्या भक्तांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली आहे.संत रामपालजी महाराज सतलोक आश्रम ढवळपुरी अहिल्यानगर महाराष्ट्र सेवा कमिटीचे वतीने रक्तदान शिबिराचे कार्य कौतुकास्पद आहे. संत रामपाल महाराजांच्या भाविकांनी सामाजिक व धार्मिक कार्यातून शांती,एकता व सेवेचा संदेश दिला आहे. असे प्रतिपादन जनकल्याण रक्तपेढीचे जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास मढीकर यांनी केले आहे.

सतलोक आश्रम ढवळपुरी येथे संत रामपाल महाराज यांच्या उपस्थितीत कबीर साहेब प्रकट दिवस निमित्त जनकल्याण रक्तकेंद्र व अर्पण रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.या रक्तदान शिबिरात २१६ यूनिट रक्तदान भाविकांनी केले. व २५० भाविकांनी देहदान फॉर्म वर स्वीकृति दिली. तसेच पाच जोडप्यांचे हुंडामुक्त विवाह लावण्यात आले,ज्याने समाजातील चुकीच्या प्रथा नष्ट करण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचले गेले.यावेळी महाराष्ट्र,कर्नाटक,आंध्र प्रदेश, येथून आलेल्या

लाखो भक्तांनी भंडाऱ्याचा आनंद लुटला.

मुनिंदर धर्मार्थ ट्रस्टने संत रामपाल जी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली सतलोक आश्रम, ढवळपुरी, पारनेर, अहिल्यानगर (महाराष्ट्र) येथे लाखों श्रद्धाळू च्या उपस्थितीत संत रामपाल जी महाराज यांच्या अवतरण दिवस निमित्त रक्तदान केले आहे.या कार्यक्रमाद्वारे शांती,एकता व सेवेचा संदेश दिला.

सतलोक आश्रम ढवळपुरी महाराष्ट्र सेवादार कमिटीचे या रक्तदानाच्या महान कार्याचा गौरव प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला.व आभार व्यक्त करण्यात आला.

## राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल संध्या गायकवाड यांचा सन्मान

**महाराष्ट्र राज्य वाहतूक सुरक्षा दल व नागरी संरक्षण संघटनेतर्फे सत्कार**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांना राष्ट्रीय शिक्षक योजना एवं प्रशासन संस्थान यांच्या वतीने राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल महाराष्ट्र राज्य वाहतूक सुरक्षा दल व नागरी संरक्षण संघटना, अहिल्यानगर-नाशिक विभाग यांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करताना विविध उपक्रमांना चालना देत त्यांनी बजावलेल्या योगदानाची राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेल्याने अहिल्यानगरच्या शैक्षणिक क्षेत्रातही या पुरस्काराचे स्वागत होत आहे.

या वेळी नाशिक विभागीय उपाध्यक्ष सिकंदर शेख आणि जिल्हा समादेशक प्रकाश मिंड यांच्या हस्ते शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा माध्यमिक वेतन पथकाचे अधीक्षक रामदास म्हस्के, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुनील पंडित, विस्तार अधिकारी भिवसेन पवार आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना सिकंदर शेख म्हणाले, ''अहिल्यानगर जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी म्हणून संध्या गायकवाड यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेले योगदान निश्चितच उल्लेखनीय आहे. शिक्षण व्यवस्थेतील विविध प्रश्न, शैक्षणिक उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या हिताशी संबंधित बाबींमध्ये त्यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यांच्या या कार्याची राष्ट्रीय पातळीवर दखल घेऊन दिल्ली येथे त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, ही केवळ त्यांच्यासाठी नव्हे तर संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे.''

ते पुढे म्हणाले की, शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकारी आणि शिक्षकांसाठी राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार ही प्रेरणादायी बाब आहे. आपल्या कार्यातून गुणवत्तापूर्ण शिक्षणाला प्रोत्साहन देतानाच विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांना सहकार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांचा गौरव होणे आवश्यक आहे. संध्या गायकवाड यांच्या कार्याची राष्ट्रीय स्तरावर झालेली दखल ही जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हा समादेशक प्रकाश मिंड म्हणाले की, ''महाराष्ट्र राज्य वाहतूक सुरक्षा दल () विभाग तसेच विविध शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांना शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांचे नेहमीच मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य मिळाले आहे. शाळा, विद्यार्थी आणि शिक्षकांशी संबंधित उपक्रमांना त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक ते सहकार्य केले.

## कॉर्फबॉल प्रिमियर लीगसाठी नगरच्या दिशान गांधी याची निवड

**देश विदेशातील खेळाडूंचा सहभाग, महिनाभर विविध राज्यात सामने रंगणार**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** केंद्र सरकारच्या क्रीडा विकास व प्रोत्साहन योजनेत यावर्षी प्रथमच कॉर्फबॉल प्रिमियर लीग (केपीएल) भारतात आयोजित करण्यात आली आहे. यात भारताच्या प्रमुख खेळाडूंसह इतर देशांतील अनेक आंतरराष्ट्रीय खेळाडू सहभागी होणार आहेत. या लीगमध्ये नगरचा सुपुत्र व आंतरराष्ट्रीय खेळाडू दिशान गांधी याची प्राधान्याने निवड झाली आहे. देशातील विविध राज्यांमध्ये महिनाभर केपीएलचे सामने रंगणार आहेत.

भारतातील ८ ते १० प्रमुख शहरांमध्ये या स्पर्धेचे सामने होणार आहेत. मुले व मुली एकत्रित खेळणाऱ्या जगातील या एकमेव मैदानी खेळाची ओळख तसेच प्रचार, प्रसार या स्पर्धेतून देशभरात होण्यास मदत होईल. गुजरात, पंजाब, मुंबई, राजस्थान, उत्तर प्रदेश, दिल्ली, चेन्नई, हैदराबाद, हरियाणा या ठिकाणी सुमारे महिनाभर स्पर्धेतील सामने होतील.

केपीएलसाठी प्राधान्याने निवड झालेला दिशान गांधी या स्पर्धे साठी शुक्रवारी दिल्ली येथे रवाना होईल. स्पोर्टी भारत, गेम चेंजर्स व कॉर्फबॉल फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धा होत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय क्रीडा व अन्य विभागाच्या मंत्र्यांनी या स्पर्धेला शुभेच्छा देत पालकांनी या स्पर्धा पाहून आपल्या पाल्यांना कॉर्फबॉल क्रीडा प्रकाराकडे वळण्यास प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन केले आहे. कॉर्फबॉल प्रिमियर लीगमधील सहभागाबद्दल दिशान गांधी याचे अ.नगर जिल्हा कॉर्फबॉल असोसिएशनने अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या आहेत. या निवडीबद्दल दिशानचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## 'आयएमएस'मध्ये बीबीए व बीसीए विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन कार्यक्रम उत्साहात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** बी.पी. हिवाळे एज्युकेशन सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, करिअर डेव्हलपमेंट अँड रिसर्च () येथे नव्याने प्रवेश घेतलेल्या बीबीए व बीसीए प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी या इंडक्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. २ ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत – येथे आयोजित करण्यात आलेला हा तीन दिवसीय कार्यक्रम विविध मार्गदर्शनपर सत्रे, तज्ज्ञांचे व्याख्यान, व्यवस्थापनविषयक उपक्रम आणि स्वागत समारंभामुळे उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात इन-चार्ज डायरेक्टर डॉ. प्रणोती तेलोरे यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यांनी विद्यार्थ्यांचे परिवारात स्वागत करून महाविद्यालयीन जीवनातील शैक्षणिक शिस्त, जबाबदारी आणि उपलब्ध संधींचा सकारात्मक उपयोग करण्याचे आवाहन केले. चे सेक्रेटरी श्री. विशाल बार्नबस यांनी बीबीए व बीसीए विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत संस्थेच्या शैक्षणिक वातावरणाचा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा दृष्टिकोन स्पष्ट केला. ॲडव्हायझर डॉ. एम. बी. मेहता यांनी ' ' या माध्यमातून संस्थेची परंपरा, मूल्ये आणि वाटचाल विद्यार्थ्यांसमोर मांडली. डेप्युटी डायरेक्टर डॉ. विक्रम बार्नबस यांनी विद्यार्थ्यांना संस्थेच्या नियम व आचारसंहितेबाबत मार्गदर्शन केले. या औपचारिक सत्रात डॉ. सय्यद मुदस्सर यांनी अभ्यासक्रमाशी संबंधित मार्गदर्शन केले, तर डॉ. हर्षवर्धन भावसार यांनी अभ्यासक्रम व विद्यार्थ्यांसाठी असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

कार्यक्रमादरम्यान प्लेसमेंट विभागाचे प्रो. सुरेश खन्ना यांनी विद्यार्थ्यांना प्लेसमेंट व करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. तसेच च्या डॉ. स्वाती बार्नबस यांनी ग्रंथालयातील डिजिटल व भौतिक साधने, ई-रिसोर्सेस आणि विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या अभ्याससुविधांची माहिती दिली. श्री. सी. डी. मोहिटे यांनी प्रशासकीय विभागाच्या कार्यपद्धतीची माहिती दिली, तर सुश्री मुजावर शाफिया व सुश्री शेख खुदेजा यांनी संदर्भातील विविध उपक्रम व सुविधा विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्या.

पहिल्या दिवशी चे मालक श्री. अश्विन गांधी यांचे विशेष मार्गदर्शनपर सत्र आयोजित करण्यात आले. '१८ ' या विषयावरील त्यांच्या सत्रातून विद्यार्थ्यांना वयाच्या १८व्या वर्षानंतर करिअर, कौशल्यविकास आणि स्वतःची दिशा निश्चित करताना येणाऱ्या आव्हानांबाबत मार्गदर्शन मिळाले. बदलत्या काळानुसार सतत शिकणे, स्वतःमध्ये गुंतवणूक करणे आणि केवळ मिळणाऱ्या पगाराऐवजी आपण कोणते मूल्य निर्माण करू शकतो, यावर त्यांनी भर दिला.

दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांनी आपल्या विचार, भावना, कृती आणि कार्यक्षमतेमध्ये योग्य समतोल राखणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मोबाईल व सोशल मीडियामुळे होणारे लक्ष विचलन, भावनांचे व्यवस्थापन आणि स्वतःवर नियंत्रण ठेवणे यावर त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विचार, भावना आणि कृती यांचा परस्परसंबंध समजावून सांगत विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया देण्याआधी थांबून परिस्थितीकडे सजगपणे पाहण्याचा संदेश त्यांनी दिला.

यानंतर चे () सदस्य डॉ. मंगेश वाघमारे यांचे विशेष मार्गदर्शनपर सत्र झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना ' ' या विषयावर मार्गदर्शन केले. व्यवस्थापनाची मूलभूत तत्त्वे आणि व्यवस्थापनाचा अभ्यासक्रम तसेच भविष्यातील शैक्षणिक व व्यावसायिक जीवनातील उपयोग याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना दिशा दिली. विद्यार्थ्यांनी व्यवस्थापनाकडे केवळ अभ्यासाचा विषय म्हणून न पाहता दैनंदिन जीवन, निर्णयप्रक्रिया आणि भविष्यातील करिअरमध्ये त्याचा उपयोग कसा करता येईल, यावर त्यांनी भर दिला. इंडक्शन कार्यक्रमाच्या तिसऱ्या दिवशी आयोजन करण्यात आले. त्यांच्या उत्साहपूर्ण सादरीकरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंद, ऊर्जा आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

## सामाजिक कार्यात नि:स्वार्थ सेवेला महत्व – सचिन पवार




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सामाजिक क्षेत्रात काम करताना नि:स्वार्थ सेवा, संघटनेतील सर्वांना विश्वासात घेऊन वाहन चालकांच्या प्रश्नासाठी लढा देत, एक कार्यकर्ता म्हणून जनसेवेचे व्रत स्वीकारून यशस्वीपणे ते पार पाडले.पदाची अपेक्षा न ठेवता, काम करणाऱ्या व्यक्तीला चांगल्या कार्याची पावती मिळते पोखर्डीच्या तरुण कार्यकर्त्यावर आता ड्रायव्हर सेवा ट्रस्ट (इंडिया) ने महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवली हे गोरक्षनाथ कराळे यांच्या नि:स्वार्थ सेवा कार्याचे फळ आहे. असे प्रतिपादन पोखर्डीचे ग्रामविस्तार अधिकारी सचिन पवार यांनी केले.

नगर तालुक्यातील पोखर्डी येथे ग्रामस्थांच्या वतीने नवनिर्वाचित महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष गोरक्षनाथ कराळे यांचा ग्रामविस्तार अधिकारी सचिन पवार यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, बुके देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी पोपट जोशी, अशोक पवार, विजय जावळे,रेवनाथ जाधव, हरिभाऊ नेटके, अमित पठारे आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते. श्री.पवार म्हणाले कराळे यांना पूर्वीपासूनच समाजाच्या हितासाठी काम करण्याची आवड होती. त्यामुळे त्यांनी संपूर्ण जिल्ह्यातील वाहन चालकांच्या हक्कासाठी, प्रश्नांसाठी लढा दिला. त्यामुळे त्यांना जनसेवा ड्रायव्हर पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पद मिळाले होते. त्या पदाला योग्य न्याय देत काम करीत राहिल्याने त्यांच्यावर आता ड्रायव्हर सेवा ट्रस्ट (इंडिया) सारख्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पदाची महत्त्वाची जबाबदारी वरिष्ठांनी दिली. ही बाब पोखर्डी करांच्या दृष्टीने अभिमानास्पद आहे.

या सन्मानाला उत्तर देताना श्री.कराळे म्हणाले वाहनचालक हे सर्वसामान्य व्यक्तिमत्व असते. त्यांचे अडचणी, प्रश्न मी जवळून पाहिले.

## बौद्ध समाजातील अधिकारी होण्याचे स्वप्न प्रज्ञा सरकटे यांनी केले साकार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन करून राज्य कर निरीक्षकपदी निवड झालेल्या आयु. प्रज्ञा अंबादास सरकटे यांचा समस्त आंबेडकरी समाज आणि पंचशील विद्यामंदिर प्राथमिक शाळेच्या वतीने उत्साहात सत्कार करण्यात आला. प्रज्ञा सरकटे यांनी राज्यात महिला १७ वा क्रमांक मिळवत अहिल्यानगर शहरातील बौद्ध समाजातील पहिली कन्या म्हणून हे उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

पंचशील विद्यामंदिर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसमोर हा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. गोरगरीब व सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना प्रज्ञा सरकटे यांच्या यशातून प्रेरणा मिळावी, 'आपणही शिकून अधिकारी होऊ शकतो' हा आत्मविश्वास विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण व्हावा, या उद्देशाने हा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी नगरसेवक सुरेश बनसोडे, पंचशील विद्यामंदिर संस्थेचे अध्यक्ष सुमेध गायकवाड, प्रा. जयंत गायकवाड, सेवा निवृत्त अपर पोलिस अधीक्षक शाहूराव साळवे, सुनील क्षेत्रे, किरण दाभाडे, अमित काळे, महेश भोसले, सागर ठोकळ, रत्नाताई वाघमारे, प्रा. भीमराव पगारे, रवींद्र कांबळे, प्रा. एल बी जाधव, जयश्री गायकवाड, भाऊसाहेब देठे, प्रा. अंबादास सरकटे, समीर भिंगारदिवे, सचिन शेलार, मुख्याध्यापक उंडे सर, गोसावी मॅडम, उकर्डे सर, साबळे सर, शिरसाठ मॅडम, वांगणे मॅडम, तिवारी मॅडम यांच्यासह समस्त आंबेडकरी समाजाचे कार्यकर्ते, पंचशील विद्यामंदिर प्राथमिक शाळेचे शिक्षक, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रज्ञा सरकटे या आंबेडकरी चळवळीतील मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व प्रा. अंबादास सरकटे यांच्या कन्या आहेत. सामाजिक आणि शैक्षणिक वातावरणातून मिळालेल्या प्रेरणेच्या जोरावर त्यांनी स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविले आहे.

नगरसेवक सुरेश बनसोडे म्हणाले की, प्रज्ञा सरकटे यांनी मिळविलेले यश हे संपूर्ण समाजासाठी अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या यशातून प्रेरणा घेऊन मोठी स्वप्ने पाहावीत आणि शिक्षणाच्या माध्यमातून अधिकारी होण्याचे ध्येय निश्चित करावे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

# शाडू मातीपासून गणपती बनवा कार्यशाळा उत्साहात





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दादा चौधरी विद्यालय, अहिल्यानगर येथे रोटरी क्लब ऑफ अहमदनगर डिग्निटी व दादा चौधरी विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'शाडू मातीपासून गणपती बनवा' या पर्यावरणपूरक कार्यशाळेला विद्यार्थी, पालक आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना शाडू मातीची ओळख करून देत पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने आकर्षक गणेशमूर्ती साकारत सर्जनशीलता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. गणेशोत्सव साजरा करताना प्लास्टर ऑफ पॅरिसऐवजी शाडू मातीच्या मूर्तींचा वापर करण्याचे महत्त्व यावेळी पटवून देण्यात आले.

कार्यक्रम दादा चौधरी विद्यालय कार्यशाळेचे प्रशिक्षण व मार्गदर्शन विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. अशोक डोळसे यांनी केले. या उपक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ अहमदनगर डिग्निटी यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष रोटे. ॲड. अभिषेक भगत यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने छोटी का होईना जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी मोठे योगदान दिले. उपस्थितांनी ''मातीपासून निर्मिती, हिच खरी सेवा'' हा संदेश आत्मसात करत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा संकल्प केला. रोटरी क्लब ऑफ अहमदनगर डिग्निटीचे अध्यक्ष रोटे. ॲड. अभिषेक भगत, सचिव रोटे. डॉ. वैशाली पाटील, प्रकल्प प्रमुख रोटे. उज्ज्वला राजे व सह–प्रकल्प प्रमुख रोटे. सुहास लवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# के. जी. कला व वाणिज्य (रात्र) महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री केशरचंद गुलाबचंद मुनोत नेवासकर सार्वजनिक ट्रस्ट संचलित, महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न के. जी. कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स (रात्र) महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६२०२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टचे विश्वस्त श्री. किशोर मुनोत आणि कॅम्पस डायरेक्टर प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांनी केले आहे.

महाविद्यालयामध्ये बी.ए., बी.कॉम., बी.कॉम. (कॉम्प्युटर एप्लीकेशन) तसेच बीबीए (बिझनेस मॅनेजमेंट) या पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरू आहेत. बी.कॉम. अभ्यासक्रमात बँकिंग अँड फायनान्स, कॉस्ट अँड वर्क अकाउंटिंग, मार्केटिंग आणि बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन हे विशेष विषय उपलब्ध आहेत. याशिवाय महाविद्यालयामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे एमबीए अभ्यासक्रमाचे अधिकृत अध्ययन केंद्र कार्यरत असून, नोकरी किंवा व्यवसाय करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पदव्युत्तर शिक्षणाचीही उत्कृष्ट सुविधा उपलब्ध आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण नुसार विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण, कौशल्याधारित आणि रोजगाराभिमुख शिक्षण देण्यासाठी महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पत्रकारिता, उद्योजकता विकास, टॅली, ऑफिस ॲडमिनिस्ट्रेशन व ऑफिस ऑटोमेशन, ट्रॅव्हल अँड टुरिझम, सॉफ्ट स्किल्स, पायथॉन, फ्रंट लाईन कम्युनिकेशन आणि रिसेप्शनिस्ट यांसारखे विविध कौशल्यवर्धक अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात आले आहेत. याशिवाय शहरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी संगणक साक्षरतेवर आधारित मोफत अभ्यासक्रमही महाविद्यालयात राबविण्यात येत आहेत.

महाविद्यालयामध्ये आधुनिक संगणक प्रयोगशाळा, डिजिटल क्लासरूम, सुसज्ज ग्रंथालय, अनुभवी व पात्र प्राध्यापकवर्ग, विद्यार्थी कल्याण उपक्रम, करिअर मार्गदर्शन, उद्योग क्षेत्राशी प्रत्यक्ष संवाद तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध उपक्रम नियमितपणे आयोजित केले जातात. दिवसभर नोकरी, व्यवसाय किंवा इतर कारणांमुळे नियमित शिक्षण घेणे शक्य नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी रात्र महाविद्यालय ही शिक्षणाची एक उत्तम संधी उपलब्ध करून देत आहे.

यावेळी विश्वस्त श्री. किशोर मुनोत म्हणाले, ''उच्च शिक्षण समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावे, हा संस्थेचा मूलभूत उद्देश आहे. शिक्षणात खंड पडलेल्या किंवा नोकरी–व्यवसाय सांभाळत शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे महाविद्यालय अत्यंत उपयुक्त ठरत आहे. आधुनिक शिक्षणाबरोबरच कौशल्य विकास आणि मूल्याधिष्ठित शिक्षण देण्यावर आमचा भर आहे.'' कॅम्पस डायरेक्टर प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांनी सांगितले, ''राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत रोजगाराभिमुख कौशल्ये मिळावीत यासाठी विविध नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. पदवी अभ्यासक्रमांसोबतच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या एमबीए केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास आणि रोजगारक्षमता वाढविण्यासाठी महाविद्यालय सातत्याने कार्यरत आहे. बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षणात खंड पडलेल्या युवक–युवतींनी या प्रवेश प्रक्रियेचा लाभ घ्यावा.'' प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह महाविद्यालयाशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन महाविद्यालय प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. संपर्क : ९८५०१३६६५४ / ९८३४७५६१४१ ईमेल- kg.college@yahoo.com वेबसाईट www.kgcollege.in

# पैठण येथील थापटी तांड्यातील 'कुलस्वामिनी' कला केंद्राला ब्रेक

## जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्याकडून परवाना अर्ज नामंजूर; ग्रामस्थांच्या आंदोलनाला यश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील थापटी तांडा शिवारातील प्रस्तावित 'कुलस्वामिनी' कला केंद्राला मोठा धक्का बसला आहे. कला केंद्रासाठी सादर करण्यात आलेला परवाना अर्ज जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी नामंजूर केला. याबाबतचा अंतिम आदेश ९ सप्टेंबर रोजी काढण्यात आला. प्रशासनाच्या या निर्णयामुळे कला केंद्राला विरोध करणाऱ्या परिसरातील ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.

कला केंद्राच्या बांधकामासह परवानगी, कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नावर परिसरातील ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधींनी सातत्याने आवाज उठविला होता. देवगाव, थापटी तांडा, राजापूर, कडेठाण, अंतरवाली खांडी, घारगाव, एकतुनी, ब्राह्मणगाव तसेच आडूळ परिसरातील ग्रामस्थांनी या प्रश्नासाठी आंदोलने, रास्ता रोको तसेच जलसमाधी आंदोलनाचा इशारा देत प्रशासनाचे लक्ष वेधले होते.

या प्रकरणात ग्रामपंचायत, महसूल, पोलिस आणि नगररचना विभागाच्या अहवालांसह न्यायालयीन आदेश व संबंधित कागदपत्रांचा विचार करण्यात आला. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी कला केंद्रासाठी सादर केलेला परवाना अर्ज नामंजूर करण्याचा निर्णय घेतला. नियोजन प्राधिकरणाची मंजुरी न घेता करण्यात आलेल्या बांधकामाची नोंदही आदेशात करण्यात आली आहे. तसेच कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता, सामाजिक स्वास्थ्य आणि महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने निर्माण झालेल्या अडचणींचाही विचार करण्यात आला.

**प्रशासनाच्या निर्णयाने ग्रामस्थांना दिलासा**

कुलस्वामिनी कला केंद्र कायमस्वरूपी बंद करण्याच्या मागणीसाठी परिसरातील ग्रामस्थांनी एकत्रितपणे रास्ता रोको, जलसमाधी आंदोलन तसेच मंत्रालयापर्यंत पाठपुरावा केला होता. अखेर जिल्हाधिकाऱ्यांनी परवाना अर्ज नामंजूर केल्याने ग्रामस्थांच्या आंदोलनाला यश आले आहे. प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाचे ग्रामस्थांनी स्वागत केले.

# बाबासाहेब बोडखेंच्या नेतृत्वाखाली माध्यमिक शिक्षक सोसायटी प्रगतीपथावर - आमदार संग्राम जगताप

## माध्यमिक शिक्षक सोसायटीचे नुतन चेअरमन बाबासाहेब बोडखे यांचा आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने सत्कार । अवघ्या काही दिवसांत २२ कोटी ४२ लाखांच्या ठेवी; सोसायटीला स्वभांडवली करण्याचा संकल्पाचे कौतुक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या चेअरमनपदी बिनविरोध नियुक्ती झाल्याबद्दल शिक्षक नेते बाबासाहेब बोडखे यांचा आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. बाबासाहेब बोडखे हे चळवळीतून घडलेले नेतृत्व असून, सामाजिक कार्यातही त्यांचा सातत्याने पुढाकार राहिला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली माध्यमिक शिक्षक सोसायटी निश्चितच प्रगतीपथावर जाईल, असा विश्वास आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केला. यावेळी प्रा. माणिक विधाते, सोसायटीचे माजी चेअरमन आप्पासाहेब शिंदे, प्रा. सुधाकर सुंबे, संचालक महेंद्र हिंगे, राजेंद्र कोतकर, प्रा. शिवाजी घाडगे, प्रा. दत्तात्रय दरेकर, प्रा. निलेश बांगर, सचिव स्वप्निल इथापे, दीपक आमटे आदी उपस्थित होते.

पुढे आमदार जगताप म्हणाले की, अवघ्या काही दिवसांच्या कालावधीत संस्थेत तब्बल २२ कोटी ४२ लाख रुपयांच्या ठेवी जमा करून संस्था स्वभांडवली करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. हा उपक्रम अत्यंत महत्त्वाकांक्षी असून, त्याला सभासदांकडून मिळत असलेला प्रतिसाद कौतुकास्पद आहे. संस्थेवरील अनावश्यक खर्च कमी करून उपलब्ध आर्थिक साधनसंपत्तीचा योग्य वापर करण्याच्या दिशेने सुरू असलेले कामही महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

बाबासाहेब बोडखे म्हणाले की, माध्यमिक शिक्षक सोसायटीमध्ये परिवर्तन मंडळाची सत्ता आल्यानंतर सभासद हिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन संस्थेचा कारभार सुरू करण्यात आला आहे. संस्थेचा कारभार अधिक काटकसरीने करण्याबरोबरच अनावश्यक आणि वाढीव खर्चाला फाटा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. संस्थेच्या आर्थिक स्थितीला अधिक बळकटी देण्यासाठी विविध उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. संस्था स्वभांडवली करण्याच्या उद्देशाने सभासदांच्या सहकार्याने वाटचाल सुरू आहे. संस्थेच्या माध्यमातून सभासदांना अधिक चांगल्या आर्थिक सुविधा उपलब्ध करून देतानाच कर्जावरील व्याजदर कमी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत. यासाठी ऐच्छिक ठेव वाढ अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानाला सभासदांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, अवघ्या काही दिवसांतच २२ कोटी ४२ लाख रुपयांच्या ठेवी संस्थेत जमा झाल्या आहेत, अशी माहिती बोडखे यांनी दिली. सभासदांनी दाखविलेला विश्वास आणि सहकार्य हे संस्थेच्या पुढील वाटचालीसाठी महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रा. माणिक विधाते यांनी बाबासाहेब बोडखे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. शिक्षक सोसायटीच्या माध्यमातून सभासदांच्या हिताचे निर्णय घेऊन संस्था अधिक सक्षम करण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना सर्वांचे सहकार्य मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### काका ट्रस्टतर्फे नूतन एसा संचालक मंडळाचा सन्मान

# शहर आणि सभासदांच्या हिताचे कार्य करा - आमदार संग्राम जगताप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आर्किटेक्ट्स, इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा), अहिल्यानगरच्या नूतन कार्यकारिणीची नुकतीच निवड झाली असून, या संपूर्ण नूतन संचालक मंडळाचा काका ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित गुणगौरव सोहळ्यात सन्मान करण्यात आला. आमदार संग्राम जगताप आणि आयुर्वेद शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप व प्रा माणिक विधाते यांच्या हस्ते एसा संस्थेचे अध्यक्ष प्रदीप तांदळे, उपाध्यक्ष सुनिल औटी, सचिव भूषण पांडव, खजिनदार संतोष खांडेकर, सहसचिव अनमोल जैन तसेच संचालक अन्वर शेख, सुनिल जाधव, सचिन डागा, संकेत पादीर, गौरव मांडगे, सागर ढगे, विजय उजनीमठ, अमेय कुलकर्णी आणि आदिनाथ आंबेकर यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, सन्मान हा केवळ निवडीबद्दल असतो असे नाही, तर त्याचबरोबर आगामी काळात अधिक चांगले काम करण्याची जबाबदारीही आपल्यावर टाकत असतो. शहराच्या सौंदर्यात भर घालण्याचे काम आर्किटेक्ट करत असतात, तर सशक्त, सक्षम आणि नियोजनबद्ध बांधकाम करण्याचे काम इंजिनीअर्स करतात. एसा संस्था या दोन्ही क्षेत्रांमध्ये उत्तम काम करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

एसा संस्था मागील चाळीस वर्षांपासून शहरात कार्यरत असून, शहराच्या विकासामध्ये संस्थेचा मोठा सहभाग आहे. सभासदांचे प्रश्न सोडविताना विविध तांत्रिक तसेच सामाजिक उपक्रम संस्थेच्या माध्यमातून सातत्याने राबविले जातात. नियमावलीमध्ये होणारे बदल तसेच नवीन तंत्रज्ञानाची माहिती सभासदांना व्हावी, यासाठी विविध सेमिनारचे आयोजन केले जाते. त्यामुळे शहराच्या जडणघडणीत एसा संस्थेचा चांगला सहभाग असल्याचे आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले.

नवनियुक्त कार्यकारिणीचे अभिनंदन करून आमदार संग्राम जगताप यांनी त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. आगामी काळात नवनियुक्त संचालक मंडळाने उत्तम कार्य करताना शहर आणि सभासदांच्या हिताचा विचार करून कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

एसा संस्थेचे अध्यक्ष प्रदीप तांदळे यांनी काका ट्रस्ट तसेच आमदार संग्राम जगताप आणि सचिन जगताप यांचे आभार मानले. आगामी वर्षात संस्थेच्या माध्यमातून विविध तांत्रिक आणि सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार संग्राम जगताप हे नेहमीच संस्थेच्या पाठीशी राहिले असून, संस्थेसमोरील विविध अडचणी सोडविण्यासाठी ते सहकार्याच्या भूमिकेत असतात, असे प्रदीप तांदळे यांनी नमूद केले. संस्थेच्या एसा भवन या इमारतीच्या उभारणीमध्येही आमदार संग्राम जगताप यांची चांगली मदत झाली आहे. तसेच एसा भवन परिसरात ओपन स्पेस निर्माण करण्याच्या कार्यात त्यांनी सिंहाचा वाटा उचलल्याचेही त्यांनी सांगितले.

एसा संस्थेचे उपाध्यक्ष सुनिल औटी यांनी वर्षभरात शहर विकासासाठी आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये संस्थेकडून आवश्यक त्या तांत्रिक बाबींसाठी मदत करण्याचे आश्वासन दिले.
आज झालेला हा सन्मान आम्हाला आगामी संपूर्ण वर्षभर चांगले काम करण्यासाठी प्रेरणा देणारा आहे. संस्थेच्या माध्यमातून शहर विकास, सभासदांचे हित तसेच सामाजिक आणि तांत्रिक क्षेत्रात अधिक प्रभावीपणे काम करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे सुनिल औटी यांनी सांगितले.

(पान १ वरुन)

## भुईकोटसाठी खरे प्रयत्न विखे पाटील यांचेच; लंकेनी श्रेय लाटण्याची स्टंटबाजी करू नये

झाल्यानंतर श्रेय घेण्यासाठी पुढे यायचे? निलेश लंके यांनी संरक्षणमंत्र्यांना पत्रव्यवहार केला असल्याचा दावा केला जात आहे. पत्रव्यवहार केला असेल तर त्याचे स्वागतच आहे. पण त्या पत्रव्यवहारानंतर काय निष्पन्न झाले? कोणता निर्णय झाला? कोणती प्रशासकीय प्रक्रिया पुढे सरकली? याचे उत्तरही जनतेला मिळाले पाहिजे. फक्त पत्र दिल्याचे सांगणे आणि त्या पत्रातून प्रत्यक्ष काय झाले हे न सांगणे, याला पाठपुरावा म्हणता येणार नाही. भुईकोट किल्ल्याच्या बाबतीत केंद्राची मंजुरी, संरक्षण विभागाची प्रक्रिया, विखे पाटील यांचा पत्रव्यवहार, संरक्षण मंत्रालयाची मान्यता आणि त्यानंतर भारतीय लष्कराची अंतिम परवानगीहा संपूर्ण घटनाक्रम कागदोपत्री उपलब्ध आहे. त्यामुळे निलेश लंके यांनी प्रत्येक ठिकाणी श्रेय लाटण्याची स्टंटबाजी करू नये. श्रेय घ्यायचे असेल तर संपूर्ण घटनाक्रमही जनतेसमोर मांडावा. कोणत्या तारखेला काय केले, कोणत्या अधिकाऱ्यांशी किंवा मंत्र्यांशी पाठपुरावा केला आणि त्यातून कोणता निर्णय झाला, हे स्पष्ट झाले पाहिजे. भुईकोट किल्ला हा कोणत्याही एका पक्षाचा किंवा व्यक्तीचा विषय नाही. तो अहिल्यानगरच्या इतिहासाचा आणि अस्मितेचा ठेवा आहे. किल्ल्याचा विकास झाला पाहिजे, पर्यटन वाढले पाहिजे आणि या ऐतिहासिक वास्तूचे संवर्धन झाले पाहिजे, हीच आमची भूमिका आहे. मात्र, एखाद्या कामासाठी ज्यांनी सुरुवातीपासून पाठपुरावा केला, त्यांचे योगदान नाकारून शेवटच्या टप्प्यातील निर्णयाचे राजकीय श्रेय घेणे योग्य नाही. राजकारणात दावे अनेक करता येतात; मात्र भुईकोटच्या विकासाचा घटनाक्रम कागदपत्रांमध्ये स्पष्ट आहे. त्यामुळे श्रेयासाठी कितीही स्टंटबाजी केली, तरी शेवटी कागदपत्रेच बोलणार आहेत. धनंजय जाधव उपमहापौर, अहिल्यानगर

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नगर शहरात कोम्बिंग ऑपरेशन

पोहेकॉ दिवटे, बेरड, कासार, सायंबर, काळे, धोंड, मपोहेकॉ दरंदले, पोहेकॉ पांढरकर, फसले, लोणारे, शिंदे, बारगजे, खामकर, इखे.पोलीस कॉन्स्टेबल शेख, बोरुडे, काळे, शिंदे, धीवर, रोहकले, लाटे, तरटे, गाडे, झाडबुके, म्हस्के, गायकवाड, भापसे, हिवाळे, शाकीर, त्रिमुखे, मेसे, थोरात, झिने आदींचा सहभाग होता.

## जन्म-मृत्यू दाखले बिनचूक भरा; नागरिकांनी वेळेत दाखले घेऊन जावे

उपस्थित नसलेल्या रुग्णालयांना नोटीस बजावावी. तसेच जन्म–मृत्यू दाखल्यासंदर्भात पुन्हा कार्यशाळेचे आयोजन करून तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे, असे निर्देशही आयुक्त डांगे यांनी दिले. पालकांनी आपल्या पाल्यांचे जन्मदाखले वेळेत काढून घ्यावेत. बाळाच्या नावाची नोंद पंधरा वर्षांपर्यंत करता येते. त्यानंतर नावाची नोंद करता येत नाही. त्यामुळे नागरिकांनी वेळेत जन्म–मृत्यूचे दाखले घेऊन जावेत, असे आवाहन त्यांनी केले.मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांनी खासगी रुग्णालयांना जन्म–मृत्यू नोंदणीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, रुग्णालयाने जन्म अहवाल संबंधित पेशंटच्या जवळच्या नातेवाईकांकडून भरून घ्यावा. त्यावर माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव व सही घेण्यात यावी. तसेच रुग्णालयातील डॉक्टरांची सही व शिक्का यासह पूर्ण माहिती भरून अहवाल सीआरएस पोर्टलवर अपलोड करावा.

आई–वडिलांच्या आधारकार्डची झेरॉक्स प्रतही पोर्टलवर अपलोड करावी. मृत्यू अहवालदेखील बिनचूक भरून सीआरएस पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे. उपजत मृत्यू असल्यास संबंधित फॉर्म भरून तो २१ दिवसांच्या आत सीआरएस पोर्टलवर अपलोड करावा. दर महिन्याच्या पाच तारखेला नमुना क्रमांक १, नमुना क्रमांक २ व फॉर्म क्रमांक ४ आदी सर्व अहवाल मनपाच्या माळीवाडा येथील मुख्य कार्यालयात जमा करावेत. वडिलांच्या आधारकार्डवरील पत्ता पिनकोडसह सीआरएस पोर्टलवर भरावा. जन्मदाखला हा केवळ जन्म घटनेचा पुरावा आहे. तो निवासी अथवा पत्त्याचा पुरावा नसल्यामुळे जन्मदाखल्यावरील पत्ता दुरुस्त करता येणार नाही. त्यामुळे पत्ता दुरुस्तीबाबत नागरिकांचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, ही बाब रुग्णांच्या नातेवाईकांना स्पष्ट करावी, असे डॉ. राजुरकर यांनी सांगितले. जन्म–मृत्यू नोंदणीनंतर कोणतीही दुरुस्ती करावयाची असल्यास नियमानुसार २१ दिवसांच्या आत हॉस्पिटल स्तरावर दुरुस्ती करण्याची मुभा आहे. दिनांक व वेळ यासंदर्भातील माहितीही बिनचूक भरावी. चूक झाल्यास हॉस्पिटल रेकॉर्ड, डॉक्टरांचे पत्र किंवा इतर आवश्यक पुरावे सादर करावेत. जन्म–मृत्यू नोंदणीतील घटना दुरुस्तीच्या नावाखाली फेरनोंदणी करू नये. अशी बाब कायदेशीर शिक्षेस पात्र आहे, असा इशाराही देण्यात आला.

## एमपीएससी सचिवाच्या तोंडाला काळे फासले

केल्याने आजची प्रतिक्रिया उमटली आहे. याबाबत माहिती देताना अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे म्हणाले, हा हल्ला कोणत्याही व्यक्तीवर नाही, तर या सडलेल्या व्यवस्थेवर आहे. काळे फासणारे संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत, मुंबई अध्यक्ष सुहास राणे, योगेश पाटील यांच्या पाठीशी संभाजी ब्रिगेड ठामपणे उभी असल्याचे राजेश परकाळे यांनी सांगितले. या घटनेनंतर प्रदेशाध्यक्ष ॲड. मनोज आखरे यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. चा अभ्यास करणाऱ्या २५ लाख विद्यार्थ्यांच्या आणि महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेच्या वतीने संभाजी ब्रिगेडने या भ्रष्ट व्यवस्थेच्या आणि नालायक सरकारच्या तोंडाला काळे फासले आहे. महेंद्र हरपाळकरच्या थोबाडीत मारली आहे ती या सरकारला जनतेच्या वतीने संभाजी ब्रिगेडने मारलेली थप्पड आहे. सरकार गेंड्याच्या कातडीचे आहे, त्यांना ज्या भाषेत समजते त्या भाषेत सांगितले पाहिजे. चे अध्यक्ष व सचिव यांनी तत्काळ राजीनामा दिला नाही, तर पुढचा नंबर हा अध्यक्षांचा असेल यात तिळमात्र शंका नाही,'' असा थेट इशारा आखरे यांनी दिला आहे. यापूर्वी आपल्या आवाहनात ॲड. आखरे म्हणाले होते की, ''आज प्रश्न फक्त एका पेपरफुटीचा नाही, प्रश्न आहे शिक्षणाच्या विश्वासार्हतेचा, लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याचा, संविधानाने दिलेल्या समान संधीच्या अधिकाराचा.'' तर संभाजी ब्रिगेडचे महासचिव सौरभ खेडेकर म्हणाले ''छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य दिले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान दिले, महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचा प्रकाश दिला. आता त्या प्रकाशाचे रक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी तडजोड नाही! शिक्षणावर अन्याय सहन नाही. दरम्यान आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे